# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०४/०३/२०२५ (मंगळवार)**

---

## पोलीसांच्या सर्तक रात्रगस्त मुळे घरफोडी चा पाहीजे आरोपी मिळुन आला

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— दिनांक ०३/०३/२०२५ रोजी खापरखेडा पोलीस रात्रगस्त करीत असतांना पोलीसांना मौजा दहेगाव रंगारी, पुला खाली रामा उर्फ बंडया मारोती दांडेकर, रा गिट्टीखदान,वडार मोहल्ला ,नागपुर आणि त्याचा साथीदार नामे हनुमान मधुकर धोत्रे ,रा. गंगानगर काटोल नाका वाडी रोड,नागपुर हे मोटर सायकल वर सुर्यास्त ते सुर्योदय दरम्यान स्वत:चे अस्तीत्व लपवुन फिरत असतांना मिळुन आले. आरोपीतांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी कोणत्याही प्रकारचे समाधान कारक उत्तर दिले नाही. तसेच आरोपीतांची पंचासमक्ष झडती घेतली असता त्यांच्या जवळ एक लोखंडी रॉड मिळुन आला. कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने आरोपी फिरत असल्याबाबत पोलीसांना खात्री झाल्याने त्यांनी अधिक विचारपुस केल्यावर अरोपी नामे रामा उर्फ बंडया मारोती दांडेकर, रा गिट्टीखदान,वडार मोहल्ला ,नागपुर याचे वर पोलीस स्टेशन खापरखेडा येथे **अप क्र ४७६/२०२३ कलम ४५७,३८०,३४ हा गुन्हा नोंद असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपीस नमुद घरफोडी च्या गुन्हयात अटक करण्यात आले.** तसेच हनुमान मधुकर धोत्र,वय २३ वर्षे रा. गंगानगर काटोल नाका वाडी रोड,नागपुर यांच्यावर रात्रीच्या अंधारात आपले अस्तीत्व लपवुन कोणता तरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने मिळुन आल्याने **त्याचेवर कलम १२२ मपोका अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

आरोपीचा ताब्यातुन पंचासमक्ष १) होन्डा कंपनीची गाडी क्र. एम एच ४९— बी सी ३२६९ किंमती अंदाजे ६०,००० /— रूपये २) एक लोखंडी रॉड किंमती ५०/— रूपये एकुन किंमती ६०,०५० रूपये चा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे.